# मेट्रो ३ चे १८ टक्के काम पूर्णत्वास

**मुंबई** : भूमिगत असणाऱ्या मेट्रो ३ चे १८ टक्के काम पूर्ण झाले असल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने केला आहे. आतापर्यंत १८ लाख २२२ हजार स्किंट पाईल्स उभारण्यात आल्या आहे. तसेच ६ लाख ३२ हजार ७१६ क्यूबीक माती बाहेर काढण्यात आली असल्याचे एमएमआरसीएलने प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

**सविस्तर वृत्त** पान २ वर



# मेट्रो ३ चे १८ टक्के काम पूर्णत्वास

**मुंबई :** भूमिगत असणाऱ्या मेट्रो ३ चे १८ टक्के काम पूर्ण झाले असल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) केला आहे. आतापर्यंत १८ लाख २२२ हजार स्किंट पाईल्स उभारण्यात आल्या आहे. तसेच ६ लाख ३२ हजार ७१६ क्यूबीक माती बाहेर काढण्यात आली असल्याचे एमएमआरसीएलने प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

३३.५ किमीच्या मेट्रोच्या एकूण कामाचा खर्च २३ हजार १३६ कोटी आहे. जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी अर्थात जायकाच्या माध्यमातून मेट्रो ३ च्या बांधकामासाठी मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. तर, उर्वरित खर्च केंद्र व राज्य सरकार संयुक्तपणे करणार आहे. सध्या युद्ध पातळीवर काम सुरू असून यामध्ये मेट्रोच्या प्राथमिक पायावर भर देण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील कार डेपोचे काम मार्च २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचा अंदाज बांधण्यात आला आहे. त्यानुसार आंतरराष्ट्रीय विमानतळ ते कप परेडपर्यंतचा मार्ग डिसेंबर २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात येईल, असे एमएमआरसीएलचे म्हणणे आहे. सध्या १७ भव्य टीबीएम मशीनद्वारे भूमिगत काम जोमात सुरू आहे. या टीबीएम मशीनना नद्यांची नावे देण्यात आली आहेत. पॅकेज १ मध्ये सूर्या, पॅकेज २ मध्ये वैतरणा, पॅकेज ३ मध्ये तानसा, पॅकेज ४ मध्ये कृष्णा, पॅकेज ५ मध्ये गोदावरी, पॅकेज ६ मध्ये तापी आणि पॅकेज ७ मध्ये वैनगंगा या टीबीएम मशीन भूमिगतरीत्या कार्यरत आहेत.